# ४ मानवी विकास

**४.१. प्रस्तावना – मानवी विकासाची संकल्पना**

**४.२ विकासाची वैशिष्ट्ये**

**४.३ विकासाच्या समांतर संकल्पना (वाढ, विकास आणि परिपक्वन)**

**४.४ विकासाच्या अवस्था**

४.४.१ जन्मपूर्व अवस्था

४.४.२ जन्मानंतरच्या अवस्था

**अध्ययन उद्‌दिष्ट्ये :**

या पाठाचे उद्‌दिष्ट विद्यार्थ्यांना खालील मुद्दे समजून घेणे सोयीस्कर व्हावे.


१. मानवी विकास म्हणजे जाणून घेणे.

२. मानवी विकास आणि संबंधित संकल्पना समजून घेणे

३. मानवी विकासाच्या अवस्था समजून घेणे.

४. दैनंदिन आयुष्याचा विकासाच्या तत्त्वांशी संबंध जोडणे.

## ४.१ प्रस्तावना



या पाठात आपण विकासाची व्याख्या, वैशिष्ट्ये आणि इतर समांतर संकल्पनाची चर्चा करणार आहोत.

विकास म्हणजे बदलांची सातत्यपूर्ण मालिका जी परिपक्वता आणि अनुभवामुळे येते. मानवी आयुष्याचे वेगवेगळे टप्पे आहेत. आणि जशी पृथ्वीचे भौगोलिक वय किवा मानवी आयुष्याचे क्रांतिकारी टप्पे महत्त्वाचे आहेत तितकेच मानवी आयुष्य हे महत्त्वाचे आहे.

## ४.२. विकासाची वैशिष्ट्ये :

### १. विकासामध्ये विशिष्ट आकृतीबंध असतो :

मानव व मानवेतर प्राण्यांमध्ये विकासाची गती, मर्यादा व दिशा याबाबत ठराविक आकृतीबंध आढळून येतो. प्रत्येक जीव आपल्यासारख्या वैशिष्ट्ये असलेला जीव तयार करतो. यामध्ये जन्मपूर्व व जन्मोत्तर अवस्थेमध्ये विशिष्ट आकृतीबंध आढळून येतो. उदा. सर्व बालके प्रथम एका बाजूला वळणे, रांगणे, उभे रहाणे आणि नंतर चालायला शिकते. तसाच वर्तनामध्ये देखील निश्चित आकृतीबंध दिसून येतो. उदा. भाषेच्या विकासामध्ये सुरवातीला अर्थहिन शब्द बोलणे, बडबडणे नंतर विशिष्ट शब्द बोलणे आणि मग वाक्य बोलायला शिकतो.

### २. विकास विशिष्ट दिशेने दिसून येतो.

विकास हा जन्मपूर्व आणि जन्मोत्तर अवस्थेमध्ये होताना आढळून येतो. यामध्ये प्रमुख दोन तत्वे आढळून येतात.

#### (१) शीर्ष–पुच्छ (Cephalocaudal)

शीर्ष–पुच्छ तत्त्वानुसार विकासकार्य प्रथम डोक्याच्या ठिकाणी सुरु होते व नंतर हातापायाचा विकास होतो. या तत्वानुसार बालक प्रथम डोक्याच्या हालचालींवर नियंत्रण ठेवायला शिकते व नंतर हातापायांवर नियंत्रण करायला शिकते.

#### (२) समीप–दूरस्थ (Proximo Distal)

समीप–दूरस्थ तत्त्वानुसार शरीराचा मध्यवर्ती भागाचा विकास सर्वप्रथम होतो व नंतर बाह्य भागाता विकास होतो. म्हणजेच प्रथम मज्जारज्जूचा विकास व नंतर बाह्य भागाचा विकास होतो.

### ३. विकासामध्ये सातत्य आढळते –

विकास प्रक्रियेमध्ये एक अवस्था पुढच्या अवस्थेचा आधार ठरतो. यामध्ये विविध अवस्था दिसून येतात.

### ४. विकास हा सामान्याकडून विशिष्टाकडे होतो –

बालकाच्या विकास प्रक्रियेमध्ये सर्व क्षेत्रात सामान्यापासून विशिष्टाकडेच तत्त्व आढळून येते. कायिक विकासामध्ये बालक सर्व प्रथम संपूर्ण हाताचा वापर एखादी वस्तू धरायला करतो व नंतर त्यात बदल होतो, तळहाताचा वापर व नंतर बोटांचा वापर करुन एखादी वस्तू हातात धरतो.

### ५. विकासामध्ये व्यक्तीभिन्नता आढळते –

मानवी विकासाचा आकृतीबंध जरी सर्व बालकांचा एकसारखाच असली तरी विकासाचा वेग प्रत्येकात वेगवेगळा दिसून येतो.

### ६. विकासाचा वेग प्रत्येक अवयवाचा भिन्न दिसून येतो –

बाल्यावस्थेमध्ये हातापायाचा विकासाचा वेग कुमारावस्थेपेक्षा कमी असतो. मेंदूचा विकास वयाच्या १६ व्या वर्षापर्यंत होतो परंतू मेंदूचे कार्यान्वित होण्यास वेळ लागतो. अशाच प्रकारचा अनुभव आपल्याला मानसिक प्रक्रियांमध्ये दिसून येतो. विकास अवस्थेमधील बऱ्यात गोष्टी बालक बाल्यावस्थेतच शिकत असतो. विविध खेळ बालक बाल्यावस्थेत आत्मसात करतो.

### ७. विकास एकात्मतेकडे नेतो –

विशिष्ट कार्य आत्मसात करण्यासाठी प्रथम त्यातील काही घटक एकत्र करुन कार्य पूर्ण केले जाते. उदा. जसे सुरवातीला सुट्या शब्दांचा उच्चार, नंतर काही वाक्य व नंतर संपूर्ण वाक्य व भाषा शिकली जाते.

### ८. वर्तन समस्या काही अवस्थेत अपेक्षित असतात –

विकासाच्या सर्व अवस्थांमध्ये बालकाचे विशिष्ट वर्तनबंध असतात. जर त्यात काही बदल असेल तर ते अपसामान्य आहे असे समजू नये. कालांतराने त्याच्या वर्तनात सुधारणा होते.

### ९. विकासाचे पूर्वकथन करता येते –

प्रत्येक बालकाचा विकासाचा वेग हा ठरलेला असतो. त्यामुळे त्या बालकाचा विकास वेग कसा असेल याबद्दल भाकीत करता येते.

**तक्ता क्र. १**

**वाढ, विकास व परिपक्वनाची थोडक्यात माहिती**

| संकल्पना | वाढ | विकास | परिपक्वता |
|---|---|---|---|
| वैशिष्ट्ये | • ही वाढ संख्यात्मक असते.<br>• ही शारीरिक असते.<br>• आकारात आणि वजनामध्ये दिसून येणारा बदल येतो.<br>• वाढ ही विकासाचा एक भाग आहे. | • गुणात्मक बदल<br>• शारीरिक व मानसिक वर्तनाद्वारे दिसून येते.<br>• विकास सर्व समावेशक आहे. | • पेशींमधील वाढ<br>• आनुवंशिक<br>• काहीही बदल करता येत नाही. |

### १०. बालकाचा विकास हा सर्वसमावेशक असतो :

सर्वसमावेशक विकासामध्ये शारीरिक व मानसिक विकास आणि सामाजिक सांस्कृतिक घटक जसे कुटुंब, मित्र, शाळा यांचा बालकाच्या विकासामध्ये एकत्रित परिणाम होतो.

### ४.३ विकासाच्या समांतर संकल्पना :

वाढ, परिपक्वता आणि विकास मानवी विकासाचा अर्थ समजून घेण्यासाठी आपल्याला वाढ, परिपक्वता आणि विकास या संकल्पना समजून घेणे गरजेचे आहे. वाढ ही शारीरिक बदलांची असते ज्यात शारीरिक आकार व वजनातील बदलांचा समावेश होतो.

परिपक्वनामध्ये जैविक क्षमतांचे नैसर्गिक रीतीने आणि योग्य वेळी प्रकटीकरण होते. ही गुणवैशिष्ट्ये योग्य वेळी नैसर्गिक रीतीने प्रकट होतात आणि हे परिवेशावर किवा प्रशिक्षणावर अवलंबून नसते. उदा. १२ महिन्याचे मूल चालायला शिकते.

विकास हा परिपक्वन व प्रशिक्षण आणि परिवेशीय घटकांच्या आंतरक्रियेमुळे होते.

वैकासिक मानसशास्त्रज्ञांनी विकासाच्या गुणवैशिष्ट्यांचा आणि अवस्थांचा अभ्यास केला. येथे आपण विकासाच्या विविध वैकासिक अवस्थांचा अभ्यास करणार आहोत.

### ४.४ विकासाच्या अवस्था :


#### ४.१.१ जन्मपूर्व अवस्था

जन्मपूर्व काळ हा गर्भ धारणेपासून ते जन्मापर्यंत असतो हा काळ साधारण २३८ ते २९० दिवसांचा असतो. हा तुलनेने छोटा काळ आहे पण या काळात अतिशय वेगवान आणि महत्त्वाचे वैकासिक बदल घडून येतात. जन्मपूर्व विकास हा अंडावस्था, भ्रूणावस्था, गर्भावस्था या तीन अवस्थेत होतो .

**(अ) अंडावस्था :**

ही अवस्था गर्भधारणे पासून १५ दिवसाची असते. या काळात फलित अंडे हे फॅलोपियन नलिके मधून गर्भाशयापर्यंत प्रवास करते आणि तिथे ते गर्भाशयाच्या भिंतीला चिकटते. या काळात फलितांडाचे विभाजन व द्विगुणन होत जातात.

**(ब) भ्रूणअवस्था :**



**चित्र ४.१ भ्रूण**

ही अवस्था साधारण तिसऱ्या आठवड्यात सुरु होते व नवव्या आठवड्यापर्यंत चालते. या काळात या पेशींच्या गोळ्याला भ्रूण असे म्हणतात. या काळात या पेशींच्या गोळ्याला मानवी आकार प्राप्त होण्यास सुरुवात होते. ही अवस्था मेंदूच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावते. या अवस्थेत अंतर्गत व बाह्य अवयवांचा विकास होतो.

**(क) गर्भावस्था :**

या अवस्थेत मेंदूच्या विकासात खूप महत्त्वाचे बदल घडतात ही अवस्था नवव्या आठवड्यात चालू होते आणि जन्माच्या वेळी संपते. जे अवयव भ्रूणावस्थेत दिसू लागतात त्यांची वाढ या काळात जोमाने होत राहते.

**जन्मपूर्व अवस्थेची वैशिष्ट्ये :**

(१) अनुवंशिकता ही नंतरच्या विकासाचा पाया ठरते.

(२) आईच्या गर्भाशयात पोषक ठरणारे घटक आनुवंशिक क्षमतांच्या विकासाला मदत करतात तर त्रासदायक ठरणाऱ्या घटकांमुळे विकासाला खीळ बसते

(३) लिंग निश्चितीकरण हे जन्मपूर्व अवस्थेच्या पहिल्या ३ महिन्याच्या काळात होते.

(४) संपूर्ण आयुष्याचा काळ पाहता जन्मपूर्व अवस्थेत सर्वात वेगवान विकास होतो.

(५) योग्य काळजी न घेतल्यास ही अवस्था शारीरिक व मानसिकदृष्ट्या धोकादायक ठरू शकते.

#### ४.४.२ जन्मानंतरच्या अवस्था :

**(अ) अर्भकावस्था :** जन्मापासून ते पहिले १५ दिवस हा काळ अर्भकावस्थेचा मानला जातो. याकाळात अर्भकाला बाहय वातावरणाशी जुळवून घ्यावे लागते. त्याला वातावरणातील बदल, श्वसन क्रिया, चोखणे, गिळणे तसेच निरुपयोगी घटकांची विल्हेवाट या मुख्य घटकांशी जुळवून घ्यावे लागते .

**अर्भकावस्थेची वैशिष्ट्ये :**

- हा सर्वात छोटा काळ आहे.
- या काळात अर्भकाला नवनवीन आणि वेगवेगळ्या वातावरणाशी संपूर्णपणे जुळवून घ्यावे लागते. या काळात महत्त्वाच्या व्यक्तीच्या अभिवृत्ती व्यक्तिमत्व विकासावर परिणाम करतात.

**(ब) शैशवावस्था :** या अवस्थेचा काळ हा जन्मानंतर दोन आठवड्यापासून ते जन्मानंतरची २ वर्षापर्यंतचा असतो. या काळात शिशूचा शारीरिक व कारक विकास वेगाने होत असतो. साधारण २ महिन्याचा शिशू डोके वळवू शकतो आणि ६ महिन्याचा शिशू आधाराने बसू शकतो. आणि ९ महिन्याचा शिशू आधाराने चालू शकतो. १२ महिन्याचा शिशू आधाराशिवाय चालू शकतो.



चित्र ४.२ शैशवावस्था



चित्र ४.३ शिशु विहारमधील बालक

**शैशवावस्थेची वैशिष्ट्ये :**

- शैशवावस्था हा व्यक्तिमत्वाचा पाया आहे, कारण या काळात वर्तन आकृतिबंध, अभिवृत्ती व भावनांचा विकास होतो.
- वेगवान वाढ व बदल घडत असतात.
- हे बदल गुणात्मक व संख्यात्मक स्वरूपाचे असतात.
- शिशूने या काळात स्वतच्या हालचालीवर नियंत्रण मिळवल्यामुळे ते स्वतंत्रपणे बसू शकते, उभे राहू शकते आणि वस्तू हाताळू शकते.
- या काळात शिशूचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण होते व यामुळे त्याच्या आवडीनिवडी व क्षमता विकसित होतात.

### (क) पूर्व बाल्यावस्था :

बाल्यावस्था याचे दोन भाग आहेत. पूर्व बाल्यावस्था आणि उत्तर बाल्यावस्था .

पूर्व बाल्यावस्था हा काळ २ ते ६ वर्षापर्यंत असतो. याला 'शालेय पूर्व' वय असे सुद्‌धा म्हणतात. बालकाचे स्नायूवर नियंत्रण येते तो स्वतंत्रपणे हालचाली करू शकतो. यामुळे त्याचे सामाजिक संबंध वाढतात आणि तो अनेक प्रश्न विचारू लागतो. या वयाला 'प्रश्नाचे वय' किवा 'चौकस वय' असे सुद्‌धा म्हटले जाते.

**पूर्व बाल्यावस्थेची वैशिष्ट्ये :**

- पालक याला खेळण्याचे वय मानतात कारण या वयात मुल खेळण्यासमवेत खेळते.
- शिक्षण तज्ज्ञ या वयाला 'शालेय पूर्व वय' मानतात कारण या वयात मुल शाळेत जायच्या तयारीत असते.
- मानसशास्त्रज्ञ या वयाला 'टोळीपूर्व वय' म्हणतात कारण या वयात मुल एकटेच खेळते आणि आपली खेळणी इतराना देत नाही. आता हळूहळू ते इतर मुलामध्ये मिसळू लागते.
- त्यांना अपरिचित व्यक्तीबद्‌दल चिंता व आपल्या माणसापासून दूर जाण्याची चिंता वाटू लागते.

### (ड) उत्तर बाल्यावस्था :

उत्तर बाल्यावस्था हा काळ ६ ते ११ वर्षांचा असतो आणि मानसशास्त्रज्ञ या वयाला 'टोळी वय' असे म्हणतात. या वयात मुलगे व मुली आपापले गट बनवतात, वाचण्याचे, लिहिण्याचे आणि गणितीय मुलभूत कौशल्य या काळात विकसित झालेले असते. शिक्षण तज्ज्ञांच्या मते हा काळ कौशल्य विकसनाचा आहे. या काळात तुलनेने विकास मंदावलेला असतो. सूक्ष्म कौशल्यांबरोबरच डोळे व हात यामध्ये समन्वय वाढत असतो. याच बरोबर उच्च बोधात्मक क्षमता जसे विचार करणे, तर्क करणे या देखील विकसित होत असतात.

### उत्तर बाल्यावस्थेची वैशिष्ट्ये :

- बऱ्याच पालकांसाठी हा त्रासदायक काळ ठरतो कारण या वयात मुले चौकस बुद्धीने प्रश्न विचारतात. नवनवीन कल्पना प्रत्यक्षात उतरवू पाहतात. त्याचे समाधान सरळ साध्या उत्तरांनी होत नाही.
- संपादन गरज निर्माण होण्याच्या दृष्टीने हा काळ महत्त्वाचा ठरतो.
- मानसशास्त्रज्ञ या काळाला टोळी वय असे म्हणतात.

### (इ) कुमारावस्था :

### तुम्हाला हे जाणवले आहे का?

- तुमच्या मित्र / मैत्रिणीचे वजन अचानक वाढू लागले आहे?
- तुमच्या गटातल्या मुली स्वत:च्या दिसण्याबद्दल जागरूक झाल्या आहेत.
- अचानक तुमचा मित्र / मैत्रीण त्यांना खूप आवडणाऱ्या व्यक्तीविषयी भरभरून बोलू लागतात.
- तुम्हाला सुद्धा कोणी खास मित्र/ मैत्रीण असावी असे वाटू लागते.



**चित्र ४.४ कुमारावस्थेतील मुले**

**जरा थांबा, तुम्ही कुमारावस्थेत पोहोचला आहात.**

उत्तर बाल्यावस्था आणि तारुण्य या मधील अवस्थेला कुमारावस्था असे म्हणतात. हा काळ १२-१३ व्या वर्षी सुरु होतो आणि १९-२० व्या वर्षी संपतो. या काळात अतिशय वेगवान शारीरिक विकास होत असतो. ही अवस्था पौगंडावस्थेने सुरु होते. या काळात कुमारवयीन मुलांचे वजन व उंची वाढते आणि लैंगिक अवयवांचा विकास होतो. मुलीना पहिली मासिक पाळी आणि मुलांना रात्री वीर्य उत्सर्जनाचा अनुभव येतो. लैंगिक ग्रंथीचा विकास होत असल्यामुळे हा अनुभव येतो. दुय्यम लैंगिक लक्षणे या काळात दिसू लागतात जसे मुलीमध्ये स्तनाची वाढ, मुलामध्ये दाढी मिशा येणे आणि आवाज फुटणे.

या काळात कुमार वयीन मुले स्वत:चे अस्तित्व मिळवण्याचा व स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करतात. विचार हे जास्त तर्कशुद्ध, अमूर्त व आदर्शवादी बनत जातात. या काळात कुमारवयीन मुले मित्राबरोबर रमतात.

**काही वेगळ्या समस्या कुमारवयीन मुलामध्ये उद्भवतात.**

१. **आंतरजाल (इंटरनेट) व्यसनासक्ती** : कुमारवयीन मुले समाज माध्यमे जसे फेसबुक, व्हॉटस अप, ऑन लाईन खेळावर जास्त रमतात या मुळे लक्ष केंद्रित न होण्याची व सामाजिक आंतर क्रिया टाळण्याची समस्या उद्भवते.

२. **महाविद्यालय मधूनच सोडण्याची समस्या** : काही मुले इंग्रजीचा धसका घेऊन महाविद्यालय सोडतात तर काही मुले घराला किंवा स्वत:ला आर्थिक पाठींबा द्यायचा म्हणून महाविद्यालय सोडतात.

३. **स्व ओळख समस्या** : कुमारवयीन मुळे स्व ओळखी विषयी गोंधळात असतात कारण त्यांना पालक वेळेनुसार लहान किवा मोठे असे वागवतात.

**जेम्स मर्सिया च्या स्व ओळख अवस्था :**

**(अ) स्व ओळख विमोचन रोध :**

यात कुमारवयीन मुले मान्य करतात कि इतरांना त्यांच्यापेक्षा जास्त कळते आणि त्यांचे निर्णय हे योग्यच असतील. उदा डॉक्टरचा मुलगा डॉक्टर बनेल. अशी कुमारवयीन मुले ही स्वतवर खूष असतात आणि समाधानी असतात. इतरांकडून स्वीकारले जाणे ही त्यांची गरज असते. अशी मुले ही हुकुमशाही प्रवृत्तीची असतात.

**(ब) स्व ओळख विकिरण :**

इथे कुमार कोणतेही पर्याय पडताळून पाहत नाहीत किंवा कोणतेही पर्याय स्वीकारत नाही. हे समाजात फारसे मिसळत नाहीत आणि ते बेफिकीर दिसतात पण त्यांच्या जबाबदारी न घेण्याच्या सवयीमुळे ते दृढ नातेसंबंध प्रस्थापित करू शकत नाहीत

**(क) अधिस्थगन**

इथे वेगवेगळे पर्याय पडताळून पाहतो पण तो कोणताही निर्णय घेत नाही. त्यांना अतिचिंता वाटते आणि त्यांना मानसशास्त्रीय संघर्षाचा सामना करावा लागतो. ते खूप उत्साही व लक्ष वेधून घेणारे असतात आणि इतरांशी जवळीकीचे संबंध प्रस्थापित करू शकतात.

बहुतेक कुमारवयीन मुले वरील सर्व अवस्थांमधून जातात पण बहुतेक वेळा त्यांना त्यांची स्वओळख कुमार वय संपता संपता किवा पंचविशीच्या आत होते.

**(ड) स्वओळख संपादन :**

इथे कुमार स्वत:ला पडताळून पाहतो आणि तो काय आहे आणि त्याने काय केले पाहिजे याचा शोध घेतो. कुमार जेव्हा या अवस्थेला पोचतो तेंव्हा तो मानसिकदृष्ट्या सक्षम असतो त्याची संपादन, प्रेरणा व नैतिक तर्कबुद्धी उच्च दर्जाची असते.

## ४. अवसाद :

जेव्हा कुमारवयीन मुलांचा प्रेमभंग होतो त्यांना परीक्षेत किंवा एका विशिष्ट गोष्टीमध्ये अपयश येते किंवा जवळच्या व्यक्तीचा मृत्यू होतो, त्यांना दुःख, काही गमावल्याची जाणीव किंवा तीव्र शोकाचा अनुभव येतो. काही वेळा ते इतके निराश होतात कि त्यांना दररोजची कामे करणे सुद्धा जमत नाहीत.

अवसाद हा जैविक आणि परिवेशातील घटकामुळे निर्माण होतो. परीवेशीय घटक उदा. पालकांच्या अवास्तव अपेक्षा, जीवघेणी स्पर्धा, मित्रांचा दबाव, मित्रामध्ये प्रसिद्ध नसणे, खूप कमी मित्र असणे धमकावले जाणे, नाकारले जाणे हे अवसादाशी निगडीत आहे (एले, लियांग आणि पोलमीन, २००४)

## ५. आत्महत्या :

कुमारवयीन मुलामध्ये आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे कारण मुले आत्महत्या करण्याचे जास्त धोकादायक मार्ग वापरतात तर मुलींमध्ये आत्महत्येचे अयशस्वी प्रयत्न जास्त दिसून येतात.

सामाजिक मर्यादा, कोणतेही काम चोख करण्याचा आग्रह, अति ताण व चिंता या मुळे आत्महत्येचा प्रयत्न केला जातो.

**कृती १ :**

**आत्महत्येच्या पूर्व सूचना**

- या खुणा जर तुमच्या मित्र मैत्रिणीत दिसल्या तर त्यांच्याशी बोला. त्यांना मानसशास्त्र शिक्षकांशी किवा समुपदेशकाशी बोलण्यास प्रवृत्त करा.
- जर एखादा मित्र / मैत्रिण बोलत असेल की 'माझी इच्छा आहे की मी मेलो पाहिजे' किंवा 'मी जगण्यास नालायक आहे म्हणून मी मेलो पाहिजे.'
- एखादा मित्र अचानक तास बुडवू लागला किंवा अचानक त्यांच्या गुणात घसरण दिसून आली.
- स्वतःच्या आवडत्या व महत्त्वाच्या वस्तू देऊन टाकू लागले उदा. आवडते पेन.
- मृत्यूपत्र लिहू लागला.
- भूक नाहीशी झाली किंवा खूप खाऊ लागला.

- झोपण्याच्या वेळा बदलल्या, अतिशय मंद हालचाली, सुस्तपणा आणि गप्प राहू लागला.
- वागण्यात नाट्यमय बदल जसे अजिबात बाहेर न पडणारी व्यक्ती खूप बाहेर जाऊ लागली.
- दु:ख व्यक्त करणारे संगीत, कला व वाङ्गमय आवडू लागले.

**तुम्हाला माहिती आहे का?**

World Suicide Prevention Day (WSPD)

जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिवस हा प्रत्येक वर्षी १० सप्टेंबरला साजरा केला जातो, ज्याचा मूळ हेतू आत्महत्येला प्रतिबंध करणे असा आहे. २००३ पासून आत्महत्येला प्रतिबंध होईल अशा कृति / कार्याला अंमलबजावणी होईल असा प्रयत्न केला जातो.

### कुमार वयाची वैशिष्ट्ये :

- हा महत्त्वाचा काळ आहे कारण अभिवृत्ती व वर्तनावर या काळाचा प्रभाव पडतो.
- हा बदलाचा काळ आहे. मूल बाल्यावस्थेपासून तारुण्यावस्थेपर्यंतचा हा काळ आहे.
- हा शारीरिक बदलाचा काळ आहे .
- हा आव्हानात्मक काळ आहे कारण आधी बालकाला येणाऱ्या समस्या पालक व शिक्षक सोडवतात. पण या काळात व्यक्तीला स्वतंत्र निर्णय घ्यावेसे वाटतात.
- हा काळ स्व-अस्तित्व शोधण्याचा काळ आहे .
- हा अवास्तव जगण्याचा काळ आहे. या काळात कुमारवयीन मुले जगाकडे गुलाबी चष्म्यातून पाहतात आणि ते दिवास्वप्न पाहतात. यामुळे त्यांना अभ्यासात लक्ष केंद्रित न करता येणे या समस्येला तोंड द्यावे लागते .
- हा तारुण्यावस्थेचा उंबरठा आहे.

### (फ) पूर्व तारुण्यावस्था :

तारुण्यावस्था ते प्रौढावस्था हा काळ २१-६० इतका मोठा काळ आहे. २१-४० या काळाला पूर्व तारुण्यावस्था म्हणतात व ४०-६० या काळाला उत्तर तारुण्यावस्था म्हणतात किंवा प्रौढावस्था म्हणतात.

व्यक्ती नोकरीधंद्याची निवड करून त्यात स्थिर होण्याचा प्रयत्न करते. लग्न, मूलबाळ याच काळात होऊन व्यक्ती आयुष्यात स्थिर होते.

उत्तर तारुण्यावस्थेत व्यक्ती सर्व जबाबदाऱ्या पार करून वृद्धावस्थेला सामोरी जाण्यासाठी सज्ज होते.

### पूर्व तारुण्यावस्थेची वैशिष्ट्ये :

- हा काळ आयुष्यात स्थिर होण्याचा आहे कारण या काळात व्यक्ती कायदेशीर रीतीने सक्षम झाल्यामुळे ती स्वत:च्या आयुष्याची जबाबदारी स्विकारते.
- हा वंश वृद्धीचा काळ आहे.
- या काळात येणाऱ्या समस्या या आधीच्या काळात येणाऱ्या समस्याहून पूर्णपणे वेगळ्या असतात.
- स्वत:ला आयुष्यात स्थिर करायचे असल्यामुळे या काळात व्यक्तीला ताण जाणवतो.
- ते नोकरी उद्योगात मग्न होतात, लग्न करतात या मुळे मित्रमैत्रिणींना फारसा वेळ देऊ शकत नाहीत.
- नवीन आयुष्याशी जुळवून घ्यावे लागते.
- हा काळ मूल्य बदलाचा आहे, बदललेले आयुष्य स्विकारण्याचा आहे,

### (ज) उत्तर तारुण्यावस्था / प्रौढावस्था :

हा काळ ४०-६० वर्षापर्यंत आहे. या काळात अधिक जबाबदाऱ्या येतात. प्रौढ व्यक्ती नवीन पिढीच्या मुलाना जबाबदारी घेण्यासाठी सक्षम बनवण्याचा प्रयत्न करतात. पुनरुत्पादनाची शक्यता हळूहळू मंदावत जाते. मानसिक व शारीरिक क्षमतांचा ऱ्हास होतो.

### प्रौढावस्था वैशिष्ट्ये :

- हा भीतीदायक काळ आहे कारण या काळात मानसिक व शारीरिक ऱ्हास होतो.
- हा बदलाचा काळ आहे कारण या काळात बरेचसे शारीरिक व वर्तनात्मक असे बदल घडून येतात.
- हा ताणाचा काळ आहे कारण या वयात आर्थिक जबाबदाऱ्याचे ओझे वाढू लागते.
- कामाचे ओझे, चिंता या मुळे व्यक्तीला नैराश्याचा झटका येऊ शकतो .
- हा संपादनाचा काळ आहे कारण एरीक्सन च्या मते व्यक्तीला अनेक अनुभव येतात आणि समाजाची अशी अपेक्षा असते कि व्यक्तींनी वेगवेगळ्या गोष्टींची निर्मिती करावी.
- हा मूल्यमापनाचा काळ आहे. आधी निश्चित केलेली ध्येये आणि आता मिळवलेल्या गोष्टी यांचा ताळमेळ केला जातो.
- हा रिकाम्या घरट्याचा काळ आहे कारण मुले शिक्षणासाठी किवा नोकरीधंदा, लग्न करून बाहेरगावी जातात.

### (ह) वृद्धावस्था :

हा काळ ६० वर्षापासून ते मृत्यूपर्यंतचा काळ आहे. या काळात व्यक्तीला तिच्या शारीरिक व मानसिक क्षमतांचा ऱ्हास होत असल्याचे जाणवते. तब्येतीचे वेगवेगळे त्रास उद्‌भवतात. व्यक्तीला परिवेशाशी जुळवून घ्यावे लागते. जोडीदाराच्या मृत्युमुळे काहीवेळी एकटेपणा येतो.

### वृद्धावस्था वैशिष्ट्ये :

- व्यक्तीला तिच्या शारीरिक व मानसिक क्षमताचा ऱ्हास होत असल्याचे जाणवते
- वयोमानाचा प्रभाव प्रत्येकावर वेगवेगळा पडतो .
- वृद्‌धावस्था ही वेगवेगळ्या निकषावर मोजली जाते. समाज व्यक्तीच्या दिसण्यावरून आणि हालचालीवरून ती किती वृद्‌ध झाली आहे हे ठरवतो.
- वृद्‌धावस्थेबद्‌दल साचेबद्‌ध कल्पना आहे.
- वृद्‌धावस्थेतील अनेक साचेबद्‌ध कल्पना या प्रतिकूल आहेत.
- वयस्कर व्यक्तींना अल्प संख्याक समूहाचा दर्जा आहे.
- हा भूमिका बदलाचा काळ आहे.
- वृद्‌धावस्थेत समायोजन करणे फारसे सोपे नसते.
- तरुण दिसण्याची गरज वृद्‌धापकाळात दिसून येते.



४.५ जीवनक्रम – शैशवावस्था ते वृद्‌धावस्था

**तालिका २ : विकासाच्या अवस्था थोडक्यात**

| अवस्था | काळ | वैशिष्ट्ये |
|---|---|---|
| जन्मपूर्व अवस्था | गर्भधारणेपासून जन्मापर्यंत | • पोषणासाठी पूर्णपणे मातेवर अवलंबून,<br>• शारीरिक अवयवांची वेगवान वाढ |
| अर्भकावस्था | जन्मापासून दोन आठवडे | • पूर्णपणे इतरांवर अवलंबून,<br>• प्रतिक्षिप्त प्रतिक्रियांचा विकास. |
| शैशवावस्था | आठवडे ते २ वर्ष | • कारक,बोधानिक व मनोसामाजिक विकास,<br>• जलद शारीरिक वाढ |
| पूर्व बाल्यावस्था | २-६ वर्षे | • शारीरिक वाढ तुलनेने हळू होते,<br>• बोधनात्मंक व भाषिक विकास होतो.<br>• सामाजिकीकरण सुरुवात,<br>• समायोजन क्षमतेत बदल, टोळी वय. |
| उत्तर बाल्यावस्था | ६-१२ वर्षे | • शाळेमुळे सर्वांगीण विकासास मदत,<br>• शारीरिक, मानसिक, बोधानात्मक व मनोसामाजिक विकासास प्रारंभ |
| कुमारावस्था | १२-१४ ते २०-२१ वर्षे | • वेगवान शारीरिक बदल होताना दिसतात,<br>• स्व ओळखीची संकल्पना विकसित होते.<br>• व्यवसाय निवडीविषयी जाणीव निर्माण होते. |
| पूर्व तरुण्यावस्था | प्रौढावस्था २१ ते ४० वर्षे | • शिक्षण पूर्ण होऊन नोकरी धंद्याला सुरुवात होते.<br>• योग्य जोडीदाराची निवड केली जाते,<br>• कौटुंबिक जबाबदाऱ्यांना महत्त्व दिले जाते. |
| उत्तर तरुण्यावस्था | प्रौढावस्था ४० ते ६० वर्षे | • कौटुंबिक जबाबदाऱ्यात वाढ,<br>• नोकरी धंद्यातील जबाबदाऱ्यात वाढ,<br>• सामाजिक जबाबदारीला महत्त्व,<br>• सामाजिक अपेक्षात वाढ,<br>• पालकांची जबाबदारी,<br>• स्त्रियात रजोनिवृत्ती व पुरुषात अँड्रोजेन या संप्रेरकाची निर्मिती थांबते. |
| वृद्धावस्था | ६० वर्षापासून मृत्युपर्यंत | • निवृत्तीचा काळ सुरु होतो,<br>• आरोग्याच्या समस्या उद्भवतात,<br>• सक्तीची निवृत्ती,<br>• व्यक्ती मृत्यूचा विचार करू लागते. |

## सारांश :

विकास म्हणजे बदलांची सातत्यपूर्ण मालिका जी परिपक्वन आणि अनुभवामुळे येते. मानवी आयुष्याचे अनुवश आणि परीवेशातील शारीरिक व सामाजिक घटक विकासाची दिशा ठरवतात. विकास शारीरिक, बोधानिक, भावनात्मक आणि सामाजिक पातळ्यावर योग्य वेळी होत असतो. विकासाचा आकृतिबंध व क्रम आहे. त्यामुळे विकासाचे पूर्वकथन करता येते, आपल्याला नियम व विचलन यामुळे कळू शकते. विकासाची सुरुवात गर्भ धारणेपासून होते आणि मृत्युपर्यंत चालू राहते, प्रत्येक अवस्थेत काही बदल व समस्या दिसून येतात. कोणत्या काळात कोणते बदल होतील याचे काही निकष व अपेक्षा आहेत. याला वैकासिक कार्य असे म्हणतात.

## महत्त्वाच्या संज्ञा :

- विकास
- परिपक्वन
- जन्मपूर्व अवस्था
- गर्भधारणा
- भ्रूणावस्था
- अंडावस्था
- गर्भावस्था
- अर्भकावस्था
- शैशवावस्था
- वैकासिक कार्य
- स्वओळख
- स्वओळख संपादन
- स्वओळख विमोचन रोध
- अधिस्थगन
- स्वओळख विकिरण

## महत्त्वाचे मानसशास्त्रज्ञ :

**जेम्स मर्सिया :** यांच्या मते प्रत्येक कुमारवयीन मुल स्वओळखीच्या ४ अवस्थामधून जाते स्वओळख विमोचन रोध, स्वओळख विकिरण, अधिस्थगन, स्वओळख संपादन.

## स्वाध्याय

**प्र. १. (अ) खालील वाक्ये योग्य पर्याय निवडून पूर्ण करा**

१) विकासाच्या वेगवेगळ्या अवस्थेत विकास वेग .................

अ. सारखा  ब. वेगळा

क. मंद

२) विकासामुळे येणारे बदल ................ असतात.

अ. अपेक्षित  ब. अनपेक्षित

क. अनिश्चित

३) गर्भधारणेपासून जन्मापर्यंत च्या कालखंडास ............... अवस्था म्हणतात.

अ. जन्मोत्तर  ब. जन्मपूर्व

क. नवजात

४) कुमारावस्थेत सर्वात मोठी समस्या ................. असते.

अ. अभ्यास  ब. स्व ओळख

क. कुटुंब

**(ब) जोड्या लावा**

| अ | ब |
|---|---|
| १. पूर्व बाल्यावस्था | अ. फलितांड |
| २. कुमारावस्था | ब. जन्म पासून दुसऱ्या आठवडा ते दोन वर्षे |
| ३. शैशवावस्था | क. सारखे प्रश्न विचारायचे वय |
| ४. अंकुरावस्था | ड. भौतिक वातावरणाशी अनुकूलन |
| ५. नवजात अवस्था | इ. वादळ आणि तणाव |

**(क) खालील विधाने बरोबर आहे कि चूक ते सांगा**

१) विकासात ठराविक व क्रमबद्ध आकृतिबंध आढळतो.

२) विकास हा विशिष्टाकडून सामान्याकडे होतो.

३) विकास परावलंबित्वाकडून स्वावलंबनाकडे होतो.

४) व्यक्ती मधे आलेले सर्व बदल विकासामुळे असतात.

**(ड) वेगळा घटक ओळखा.**

१) फलितांड, भ्रूणावस्था, नवजात, गर्भावस्था

२) पूर्व बाल्यावस्था, नवजात, गर्भावस्था, शैशवावस्था

**प्र. २. खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

१. मानवी विकासाच्या वैशिष्ट्यांवर लिहा.

२. मानवी विकासामध्ये जन्मपूर्व अवस्था सर्वात ही महत्त्वाची अवस्था असते?

३. वैकासिक कार्य म्हणजे काय?

४. नवजात अवस्थेचे वर्णन करा.

५. पूर्व बाल्यावस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

६. उत्तर बाल्यावस्थेची वैशिष्ट्ये लिहा.

७. कुमारावस्था / किशोरावस्थेतील समस्यांचे वर्णन करा.

८. प्रौढावस्थेची माहिती लिहा.

९. प्रौढावस्थेमधील समायोजन समस्या स्पष्ट करा.

१०. मानवी विकास विषयक तत्त्वांचे विविध क्षेत्रांमधील उपयोजन विषद करा.

**प्र. ३. साम्य आणि भेद स्पष्ट करा**

१) वृद्धी – विकास

२) परिपक्वन – विकास

३) जन्मपूर्व अवस्था – जन्मोत्तर अवस्था